महासागर
शुक्रवार दि. 20 सप्टेंबर 2024
अमरावती
पान 3

# घरफोडीत 2.30 लाखांचे दागिने लंपास

## काळाराम मंदिराजवळील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.19)-** खोलापुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काळाराम मंदिर परिसरात असणाऱ्या एका बंद घराला चोराने लक्ष्य करून 2 लाख 30 हजार रुपयांचे दागिने लंपास केले. ही घटना 13 ते 17 सप्टेंबर दरम्यान घडली. याप्रकरणात छवेंद्र मूलचंद वजीर (50) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. छवेंद्र वजीर हे 13 सप्टेंबर रोजी पत्नीसह चुलत भावाच्या घरी जेवायला गेले होते. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटातून 60 हजार रुपये किमतीची 20 ग्रॅमची सोन्याची चेन, 20 ग्रॅमची सोनसाखळी आणि 1 लाख 20 हजार रुपये किमतीची 10 ग्रॅमची सोनसाखळी, 5 ग्रॅमची अंगठी, एक लाख 20 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. 17 सप्टेंबर रोजी छेवेंद्र आपल्या घरी परतले. तेवढ्यात त्याला कपाटाला चाव्या दिसल्या. त्यांनी पत्नीने याबाबत विचारणा केली असता तिजोरीतून दागिने गायब असल्याचे आढळून आले. या तक्रारीवरून खोलापुरीगेट पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# चिखलदराच्या घाटात 'द बर्निंग बस' चा थरार

## 25 प्रवाशांचे वाचले प्राण





**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, (दि.19) -** यवतमाळहून ते चिखलदरा जात असलेल्या एका महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाची बसने चिखलदऱ्याच्या घाटात अचानक पेट घेतला. चालकाच्या प्रसंगावधाने सुदैवाने यातील प्रवाशांचे जीव वाचले. ही घटना रात्री 8.30 वाजताच्या सुमारास मोथा गावाजवळ घडली.बसला आग लागल्याची माहिती प्रवाशांनी तत्काळ अग्निशमन दलाला दिली. मात्र चिखलदरा अग्निशमन दलाची गाडी पाण्याविना घटनास्थळी दाखल झाली. त्यामुळे नागरिकांनी खासगी टँकर मागवून आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र या बसचा जळून कोळसा झाला. हा 'बर्निंग बस' चा थरार अनेकांनी याची देही याची डोळा अनुभवला.

नेर आगाराची बस नेहमीप्रमाणं यवतमाळवरून चिखलदरा इथे जात असताना मोथा गावाच्या घाट वळणावर बसच्या समोरील इंजिन अचानक भडकले. एसटी बस समोरुन पेटल्याचे चालकाला लक्षात येताच त्यांनी प्रसंगावधान राखत वाहक आणि प्रवाशांना सूचित केले. त्यामुळे वाहक चालकासह सर्व प्रवासी बसमधून लगेच खाली उतरले. यानंतर काही क्षणातच संपूर्ण बसला आग लागली. आता एसटी महामंडळही प्रवाशांच्या जीवाशी खेळायला लागले का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण बसमध्ये यावेळी आग विझविणारे यंत्र नव्हते का? असाही प्रश्न निर्माण होत आहे. या प्रकाराची चौकशी होणे गरजेचे झाले आहे.

### पाणी नसल्याबाबतची चौकशी होणार

पेटलेली एसटी बसची आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले. मात्र त्यामध्ये पाणी नसणं ही निश्चितच गंभीर बाब आहे. मी नुकताच पदभार स्वीकारला असून चिखलदरा इथल्या अग्निशमन अधिकार्याचा पदभार हा अंजनगाव सुर्जी येथील व्यक्तीकडे आहे. मी त्यांना सकाळीच चिखलदरा इथे पोहोचण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात जो कोणी दोषी असेल, त्याच्यावर निश्चितच कारवाई होईल, असे चिखलदरा नगरपरिषद मुख्याधिकारी विजय लोहोकरे यांनी स्पष्ट केले.

### रिता बंब घेवून पोहोचली अग्निशमन

बसमध्ये एकूण 25 प्रवासी होते, यापैकी पाच ते सहा प्रवासी हे मोथा येथील रहिवासी असल्यामुळे त्यांनी तत्काळ गावातील लोकांना या घटनेची माहिती दिली. ग्रामस्थांनी चिखलदरा अग्निशमन दलाला या संदर्भात माहिती देताच अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले. मात्र त्यामध्ये पाणीच नसल्याचं लक्षात येताच अग्निशमन दलाच्या कर्मचार्याची तारांबळ उडाली. यानंतर चिखलदरा इथून खासगी टँकर मागवण्यात आले. तर मोठा वासियांनी गावातून टँकरवर पाणी आणून बसची आग विजवण्याचा प्रयत्न केला. ही बस मात्र आधीच पूर्णत: जळाली, अशी माहिती मोठा इथले रहिवासी गजानन शनवारे यांनी दिली.

# 'परिवर्तन महाशक्ती' ची घोषणा



- युती व आघाडीला नवा राजकीय पर्याय
- बच्चू कडूंचा प्रहारही सहभागी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती (दि.19)-** महायुती आणि महाविकास आघाडी ला पर्याय म्हणून परिवर्तन महाशक्ती ही नवीन आघाडीला जन्माला आली आहे. ज्यामध्ये बच्चू कडू याच्या प्रहार जनशक्ती पक्षासह स्वराज्य पक्ष, स्वाभिमानी शेतकरी पक्ष, स्वतंत्र भारत पक्ष, महाराष्ट्र राष्ट्र समिती व भारतीय जवान किसान पक्ष सहभागी झाले आहेत.

आज पुण्यामध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन व सुसंस्कृत पर्याय पुढे आणण्याच्या हेतूने राज्यातील समविचारी पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या समविचारी पक्षांच्या बैठकीच्या निमित्ताने पुणे दौऱ्यावर असताना छत्रपती संभाजीराजे यांच्या स्वराज्य पक्षाच्या पुणे शहरातील मध्यवर्ती कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी स्वराज्य प्रमुख छत्रपती संभाजीराजे यांनी सर्वांचे स्वागत केले. पुणे शहरातील झालेल्या समविचारी पक्षांच्या बैठकीत परिवर्तन महाशक्ती या नावाने नवीन राजकीय पर्याय आम्ही सर्वांनी एकमताने जनतेपुढे ठेवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. यापुढे देखील अनेक राजकीय पक्ष व संघटनांना सोबत घेण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.ज्या राजकीय पक्षांना व सामाजिक संघटनांना 'परिवर्तन महाशक्ती' मध्ये सहभागी व्हायचे आहे, त्यांनी 26 सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील बैठकीत सहभागी व्हावे. असे आवाहन आ.बच्चू कडू यांनी केले आहे.

# गुजराती कांती भवन आणि कन्हैया हॉटेलवर कारवाई

## मध्यरात्रीनंतर खानावळ सुरु ठेवणे पडले महागात

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.19)-** शहरात रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या खानावळीवर पोलीस प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. बुधवारी रात्री उशिरापर्यंत सुरु असणार्या चित्रा चौक परिसरातील गुजराती कांती भवन आणि सरोज चौकातील कन्हैया हॉटेलवर पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी गुजराती कांती भवनचे नितेश गोपालदत्त शर्मा आणि संजय रमेशचंद्र शर्मा यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.सिटी कोतवाली पोलिसांचे पथक बुधवारी रात्री पोलिस स्टेशन परिसरात गस्त घालत होते. यावेळी रात्री दीड वाजतानंतरही गुजराती कांती भवन हॉटेल सुरुच असल्याचे दिसले. तेथे ग्राहक खुर्च्यांवर बसून जेवण करत होते. त्यामुळे पोलिसांनी काउंटरवर बसलेल्या तरुणाला रात्री उशिरा व्यवसाय सुरू करण्याच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यामुळे परवाना नसताना रात्री उशिरा हॉटेल सुरु ठेवल्याप्रकरणी पोलिसांनी हॉटेल संचालकाविरुध्द गुन्हा दाखल केला. त्याचप्रमाणे कन्हैया रेस्टॉरंटही रात्री दोन वाजेपर्यंत सुरू असल्याचे दिसून आले. यामध्ये पोलिसांनी हॉटेलचालक संजय रमेशचंद्र शर्माविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# मेघालयाचे राज्यपाल चंद्रशेखर एच. विजयाशंकर यांनी धनगर समाज बांधवांशी संवाद



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, (दि.19)-** मेघालयाचे राज्यपाल चंद्रशेखर एच. विजयाशंकर यांचे आज अमरावती विश्रामगृह येथे सकाळी आगमन झाले. यावेळी त्यांना पोलीस विभागामार्फत सलामी देऊन मानवंदना देण्यात आली.

पद्मश्री डॉ.विकास महात्मे, धनगर विकास मंचचे अध्यक्ष संतोष महात्मे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, विभागीय उपायुक्त संजय पवार, महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, वनविभागाचे उपवनसंरक्षक सुमंत सोळंके, सहायक वनसंरक्षक ज्ञानेश्वर देसाई, वनपरिक्षेत्र अधिकारी बी.आर.पवार तसेच चांदुर रेल्वेच्या उपविभागीय अधिकारी तेजस्विनी कोरे, तहसीलदार पूजा माटोडे, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

त्यानंतर राज्यपाल विजयाशंकर त्यांनी चांदुर रेल्वे तालुक्यातील धनगर बेडा येथे भेट दिली. यावेळी धनगर समाज बांधवांचे दैवत श्री. खंडोबा यांच्या ध्वजाचे पूजन करण्यात आले. धनगर बेडा समाज बांधवांनी राज्यपाल श्री. विजयाशंकर यांचा पारंपारिक पद्धतीने घोंगडी श्रीफळ देवून सत्कार केला . तसेच स्त्री-पुरुषांनी पारंपारिक नृत्य यावेळी सादर केले.

### धनगर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याकरिता कटीबध्द

भटकंती करणाऱ्या समाज बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. बेड्यावरील बांधवांनी आपल्या समस्या मांडण्यासाठी निवडक प्रतिनिधींसह सुनियोजित दिवशी मुंबई येथील राजभवन येथे यावे. मी तेथे महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या समोर आपल्या समस्यांबाबत सविस्तर चर्चा करू. तुमच्या समस्यांचे निराकरण करण्याचे मी निश्चित प्रयत्न करेल. पाड्यावरील सर्व बांधवांना शासकीय योजनेअंतर्गत घर बांधणे, पाड्यांपर्यंत रस्ते बांधकाम, शिक्षण व्यवस्था, आरोग्य व्यवस्था तसेच आवश्यक सर्व सुविधा पुरविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू. वन विभागामार्फत धनगर समाज बांधवांना सहकार्य मिळेल. तसेच पाड्यावर राहणाऱ्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड अशी शासकीय कागदपत्रे तयार करण्यावर भर दिला जाईल, असा विश्वास राज्यपाल विजयाशंकर यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमानंतर राज्यपाल यांनी नागपूरकडे प्रयाण केले .

# किराणा दुकानातील 80 हजार रुपयांची चोरी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.19)-** सक्करसाथ येथील एका किराणा दुकानात तुपाचा बॉक्स खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकाने काउंटरमधून 80 हजार रुपयांची चोरी केली. ही घटना 18 सप्टेंबर रोजी दुपारी 1.50 वाजताच्या सुमारास घडली. व्यापारी किशोर बलदेवप्रसाद गुप्ता यांच्या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. किशोर बलदेवप्रसाद गुप्ता यांचे येथे सरस्वती तेल आणि किराणा मालाचे दुकान आहे. 18 सप्टेंबर रोजी रोझी किशोर गुप्ता यांचा मुलगा संकेत गुप्ता एका दुकानात असताना एक ग्राहक आला. त्याने तुपाचा डब्बा मागितला. संबंधित ग्राहकाने काउंटरमधून 80 हजार रुपये चोरून नेले.

# मेळघाट विधानसभा निवडणुकीत पारडे भारी











## भाजपामध्ये इच्छुकांची भाऊगर्दी

**मारोती पाटणकर**
**चुरणी, (दि.19)-** आगामी विधानसभा निवडणूकीमध्ये मेळघाटवर सर्वांचे लक्ष लागलेले आहे. तसेच नवीन चेहरेही आता समोर येणार आहे. 'अभी नही तो कभी नही' असा नारा देत अनेक नवख्या इच्छुक उमेदवारांनीही गुडघ्याला बाशिंग बांधून मेळघाट विधानसभा क्षेत्र पादाक्रांत करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत प्रमुख पक्षांकडून उमेदवारी मिळविण्यात नवे चेहरे यशस्वी होतात की, पुन्हा एकदा जुनेच चेहरे समोर येतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

मेळघाट विधानसभा मतदारसंघात आगामी विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी अनेक नविन चेहरे मेळघाट मतदारसंघात उतरणार आहे. जसजशी निवडणूक जवळ येईल तसतशी त्यात आणखीन वाढ होण्याची शक्यता असली तरी तूर्तास अनेक नवख्या इच्छुक उमेदवारांनी मतदारसंघात आपला संपर्क वाढविला आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराला मेळघाटाच्या जनतेने लीड देऊन भाजपचे पारडे जड असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपने योग्य उमेदवाराला रिंगणात उतरविल्यास भाजप गड राखता येईल असे चित्र स्पष्ट दिसत आहे. भाजपमध्ये तिकीट मिळावी याकरिता जुन्या आणि नव्या इच्छुक उमेदवारांची भाऊगर्दी दिसत आहे. त्यामध्ये माजी आमदार प्रभुदास भिलावेकर हे मागिल पाच वर्षापासून भाजपच्या संघटनमध्ये चांगल्या प्रकारे कार्य करत आहे. जसेच मेळघाटच्या जनतेच्या संपर्कात आहे. भाजप ने गेल्या दोन वर्षापासून संघटनेमध्ये विधानसभेचे निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी दिली आहे. संपूर्ण संघटना बांधनीचे काम केले आहे. 2019 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने उमेदवार बदलल्याने मोठा पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे तेव्हाचे आमदार प्रभुदास भिलावेकर यांना उमेदवारी न दिल्यामुळे त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबद्दल मेळघाटातील जनतेची सहानुभूती त्यांच्या पाठीशी असू शकते. दुसरीकडे काँग्रेस व त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस सोडून ऐन लोकसभा निवडणुकीत भाजपमध्ये प्रवेश केलेले माजी आमदार केवलराम काळेसुध्दा भाजप कडून लढण्याची तयारी करित आहे. त्यांनी आपला आपला जन संपर्क वाढविणे सुरु केला आहे. सन 2014 व 2019 च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता, तरीसुध्दा भाजप त्यांच्यावर दाव लावेल का? हा प्रश्न आहे. त्याच प्रमाणे रमेश मावस्कर, त्यांच्या पत्नी रेखा मावस्कर, ज्योती सोळंके हे उमेदवार भाजप कडुन विधानसभा निवडणुकीत रिंगणात उतरण्यास तयार आहेत. त्यामूळे आगामी निवडणूक चांगलीच रंगतदार होणार असल्याचे दिसत आहे.

### प्रहार काय खेळ खेळणार



विद्यमान आमदार राजकुमार पटेल हे प्रहार पक्षाच्या तिकीटावर निवडूण आले होते. यंदा त्यांना पाडण्याकरिता अनेकजण ताकद लावणार आहे. त्यामूळे प्रहार काय खेळी खेळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अवघ्या एका एकरात तब्बल 7 लाखाचे मिरचीचे विक्रमी उत्पन्न



आमला विश्वेश्वर येथील बकाले बंधूंची किमया

> कोणीही प्रामाणिकपणे तसेच विविध प्रयोग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतात मेहनत घेतली तर शेतकऱ्यांना आत्महत्यासारख्या मार्गाचा अवलंब करावा लागणार नाही.
>
> **-अरविंद बकाले,**
> शेतकरी,
> आमला (वि.).

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, (दि.19)-** आधुनिक तंत्रज्ञान आणि कल्पकतेचा वापर करून अवघ्या एक एकर क्षेत्रात मिरचीचे तब्बल 6 ते 7 लाखांचे विक्रमी उत्पादन घेण्याची किमया चांदूर रेल्वे तालुक्यातील आमला विश्वेश्वर येथील शेतकरी रमेश बकाले, सुरेश बकाले व अरविंद बकाले या तीन शेतकरी बंधूंनी केली आहे.

तालुक्यातील आमला विश्वेश्वर येथील रमेश गुलाबराव बकाले, सुरेश गुलाबराव बकाले व अरविंद गुलाबराव बकाले या तिन्ही भावंडांचे संयुक्त कुटुंब असून त्यांची मुले प्रशांत बकाले, विशाल बकाले व आकाश बकाले हे सर्व मिळून शेतीत जिवापाड मेहनत घेतात. कोणत्याही शासकीय नोकरीची अपेक्षा न करता आपल्या शेतीतूनच जास्तीत जास्त उत्पन्न काढण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात. सर्व कुटुंब दिवस-रात्र राबून विविध प्रयोग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दरवर्षी शेतात वेगवेगळी पिके घेऊन विक्रमी उत्पादन घेतात व भरमसाठ नफा शेतीतून मिळवितात. अशातच यंदा त्यांनी एक एकर शेतात मिरचीचे पीक लावले होते. यात फवारणी आणि खतांचा प्रभावी वापर करून त्यांनी ही मिरची फुलविली. या मिरचीचे उत्पादन अजुनही सुरूच असून 7 लाख रुपये पर्यंतच्या उत्पन्नाचा अंदाज लावण्यात आला आहे. त्यात सध्या मिरचीला 50 ते 60 रूपये प्रतिकिलो दर मिळत असल्याने त्यांचा मिरची लागवडीचा प्रयोग यशस्वी ठरला आहे. त्यांच्या शेतात कामावर सतत 10 ते 15 मजूर वर्ग काम करीत असून आज संयुक्त कुटुंबातून हे सर्व शक्य झाले असल्याचे बकाले बंधूंनी सांगितले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अनिल बोंडे यांच्या जिभेला डागण्या देण्याची वेळ!

## तिवसा तालुका महिला काँग्रेस आक्रमक



**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.19 )-** भाजपाचे खासदार अनिल बोंडे यांच्या जिभेला आता डागण्या देण्याची वेळ आली आहे. तिवसा विधानसभा मतदार संघामध्ये एक महिला अत्यंत धडाडीने काम करते आहे, हे पाहवत नसल्याने अनिल बोंडे यांच्याकडून आमदार ?ड.यशोमती ठाकूर यांची बदनामी केली जात आहे. अशा नेत्याला आता आम्ही सोडणार नाही असे म्हणत महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली.

भारतीय जनता पक्षाचे राज्यसभेचे खासदार अनिल बोंडे यांच्या बेताल वक्तव्याचा निषेध करीत तिवसा तालुका महिला काँग्रेसच्या वतीने आज गुरुवारी(दि.19) तिवसा येथे भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. खासदार बोंडे हे नेहमीच अत्यंत भडकाऊ वक्तव्य करत असतात. त्यांच्या जिभेला लगाम नाही. राहुल गांधी यांच्या विषयी आणि आमदार यशोमती ठाकूर यांच्या विषयी ज्या पद्धतीने ते बेताल वक्तव्य करत आहे ते पाहता त्यांना धडा शिकवण्याची आणि प्रसंगी जिभेला डागण्यात येण्याची ही वेळ आहे, अशा भावना महिला कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. जिल्ह्यामध्ये काँग्रेसच्या वतीने अनेक विकास कामे केली जात आहेत. तिवसा मतदारसंघांमध्ये आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी केलेला कामाचा धडा आणि त्यांना मिळणारा जनतेचा प्रतिसाद पाहून बोंडे यांच्या पोटात दुखत आहे. मात्र त्यांच्या या निंदनीय वक्तव्याचा आपण तीव्र शब्दात निषेध करतो जनता त्यांना आता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असेही यावेळी महिला कार्यकर्त्यांनी आपल्या भावना बोलून दाखवल्या.

यावेळी रुपाली काळे, कल्पना दिवे, रोशनी पुनसे, प्रिया विघ्ने, संगीता राऊत, अर्चना राऊत, अर्चना भोबे, उषा चौधरी, सावित्री वाघमारे, सविता धानोरकर, जयश्री आबूलकर, आशा प्रधान, कल्पना अग्रवाल, सोनू आमले, कल्पना राजूरकर, संगीता ढोले, छाया कडू, मंदा शेंडे, स्वेता गावंडे, कल्पना गावंडे, शहीदबी शहा, मालता गडलिंग, शारदा अधम, कल्पना खडसे, चंदा मनवर,छाया आसोडे, रंजना कोल्हे, सुमन शापामोहन, सुनीता चौधरी, बारके, अमृता चौधरी अन्नपूर्ण चौधरी, सुषमा पावडे, सीमा कठाणे इत्यादी महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# 5 वर्षापासुन फरार आरोपीला राजस्थानातून अटक

## शिरखेड पोलीसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 )-** जामीनवर बाहेर आल्यानंतर फरार झालेल्या एका आरोपीला अटक करण्यात शिरखेड पोलिसांना पाच वर्षानंतर यश मिळाले. बबलु उर्फ शेख जफर अब्दुल खलील (50) असे आरोपीचे नाव आहे.

शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धामणगांवात राहणारा बबलु उर्फ शेख जफर अब्दुल खलील याच्याविरुध्द भादंविच्या कलम 354, 323, 506 अन्वये गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्यात आरोपीला सन 2010 मध्ये 2 वर्ष साधी कैदेची शिक्षा झाली होती. त्यानंतर काही महीने त्याने शिक्षा भोगली व सदर शिक्षेविरूध्द जिल्हा सत्र न्यायालय येथे अपील करून तो जामीनवर बाहेर आला. त्यानंतर तो फरार झाला. या आरोपीवर सन 2015 मध्येही भादंविच्या कलम 451 सहकलम, 8 पोक्सो कायदयाअतंर्गत गुन्हा दाखल होता. सदर आरोपी सन 2020 पासुन फरार असल्याने न्यायालयाकडुन आरोपीचा स्टॅंडींग वारंट जारी करण्यात आला होता. त्यानंतर शिरखेड पोलिसांनी फरार आरोपी बबलु उर्फ शेख जफर अब्दुल खलील याचा शोध सुरु केला. दरम्यान शिरखेडचे ठाणेदार सचिन लुले यांनी पोलिस उपनिरीक्षक विष्णुपंत राठोड, पोलिस हवालदार नितेश वाघ, संजय वाघमारे, राजीक खान यांचा शोध पथक तयार केले. त्यानंतर गुप्त माहितीवरून तसेच तांत्रीक पद्धती आणि पोलीसी खाक्या दाखवित पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला. त्यानंतर पोलिसांनी सदर आरोपीला राजस्थानमधील पाकीस्तान बार्डरला लागुन असलेल्या छत्तरगड तालुक्यातील सतासर येथुन ताब्यात घेतले. त्याची जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उप विभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात शिरखेडचे ठाणेदार सचिन लुले, पोलिस उपनिरीक्षक विष्णुपंत राठोड, पोलिस हवालदार नितेश वाघ, संजय वाघमारे, राजीक खान यांनी केली.

# पोलीस असल्याच्या बतावणीने वृद्धाची चेन, अंगठी चोरली

## चवरे मार्केटजवळ घडली घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 ) -** मोपेड वाहनावरून कंवर नगरमधून जात असताना दोन तरुणांनी एका वृद्धाला अडविले आणि आम्ही पोलीस आहोत, अमली पदार्थाची तपासणी सुरू आहे, असे त्यांनी वृद्धाला सांगितले आणि त्यांच्या दोन्ही हातातील सोनसाखळी व अंगठी असा एकूण 27 ग्रॅम वजनाचा ऐवज घेऊन पळ काढला. ही घटना 16 सप्टेंबर रोजी दुपारी 3.45 वाजताच्या सुमारास चवरे मार्केटजवळ घडली. नंदलाल तोलाराम गेही (69, शुभम कॉलनी, सुदर्शन बिल्डिंग चौक) यांच्या फिर्यादीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

16 सप्टेंबर रोजी दुपारी 3 वाजता नंदलाल गेही मोपेड वाहनाने कंवर नगरच्या चवरे मार्केटजवळून जात होते. दरम्यान 35 ते 40 वयोगटातील दोन तरुणांनी त्यांना हाक मारून थांबण्याचा इशारा केला. याठिकाणी अमली पदार्थ तपासत असल्याची माहिती त्यांनी नंदलाल यांना दिली. त्यानंतर त्या अज्ञातांनी नंदलाल यांचे खिसे तपासले, पॅटच्या खिशातून रुमाल काढला, तंबाखू पुडी काढली आणि रुमालावर ठेवली. त्यानंतर ते म्हणाले की, आजकाल लुटमारीच्या घटना घडत आहेत. तुमच्याकडील सोन्याची साखळी व तुमच्या दोन्ही हातातील अंगठ्या या रुमालात ठेवा, त्यानंतर नंदलाल यांनी दागिने काढून रुमालात बांधून ठेवले. आरोपींनी रुमालाला बांधलेले दागिने नंदलाल यांना परत केले. मात्र येथून निघून गेल्यावर नंदलाल गेही यांनी रुमालाकडे पाहिले असता त्यात काहीच दिसले नाही. त्यामुळे आरोपींनी हातचलाखीने सोन्याचे दागिने चोरल्याचे नंदलाल यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर नंदलाल गेही यांनी याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 353 जे चे खानापूर येथील प्रलंबित बांधकाम पूर्णत्वास



18 सप्टेंबर 2023



18 सप्टेंबर 2024

**मोर्शी ( दि.19 )-** गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित असलेले राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 353 जे चे खानापूर येथील काम अनेक अडथळ्यांची शर्यत पार करून पूर्णत्वास गेले आहे.या महामार्गाकरिता रस्त्याच्या आजूबाजूला असलेल्या 32 घरांच्या अंशत: जागा स्वीकृत करण्यात आल्या असून घरमालकांना शासनाने आर्थिक मोबदला अदा केला आहे .

या कामाकरीता गावातील आवश्यक 32 घरांपैकी दहा घरे अतिक्रमणातील असून 22 लोकांचा मोबदला देण्यात आला आहे. या दीडशे मीटर प्रलंबित बांधकामापैकी 60 मीटर बांधकाम राम मंदिर पासून पुढे पश्चिमेकडे आहे . या साठ मीटर प्रलंबित बांधकामामुळे वाहतुकीला खूपच अडथळा निर्माण झाला होता. एसटी बसेस च्या परतवाडा नागपूर मार्गे अंबाडा ही फेरी खानापूर ऐवजी चिंचोली गवळी मार्गे वळविण्यात आली होती .मोबदला मंजूर झालेल्या लोकांपैकी काही घरमालक मृतक असल्याने त्यांच्या कायदेशीर वारसाचे पत्रक जरुरी होते.हे कायदेशीर वारस पत्र तहसीलदार यांच्याकडून देण्यात आल्यानंतर मोबदला वाटप होऊ शकला .त्यामुळे गावकऱ्यांनी या प्रलंबित बांधकामा प्रकरणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास सहकार्य करावे असे प्राधिकरण तर्फे आव्हान आले होते.

# 14 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर पर्यत नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता पंधरवडा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.19 )-** नगरपरिषदेच्या वतीने 14 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2024 या कालावधीत स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.

या पंधरवड्यात मोर्शी शहरातील नागरिक तसेच विद्यार्थी वर्ग यांच्याकरिता विविध स्पर्धा उपक्रम आयोजित करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने 'एक पेड मा के नाम', स्वच्छता कर्मचारी यांचे आरोग्य शिबिर, श्रमदान, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्लॅस्टिक बंदी मोहीम, पथनाट्य, भिंती चित्र स्पर्धा,ज्येष्ठ नागरिकांकरिता चालण्याची स्पर्धा, बेस्ट फॉर्म वेस्ट प्रोजेक्ट स्पर्धा इत्यादी मानसिक व शारीरिक आरोग्याला तसेच स्वच्छतेला पोषक असणारे उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रम यशस्वीपणे राबविण्याकरिता मोर्शी शहरातील सर्व शाळा महाविद्यालय कार्यरत आहेत. तसेच मोर्शी नगरपरिषद चे सर्व अधिकारी अश्विनी खिराडे, अमोल ढोले, भूषण पावडे, नजमा शाह, अर्चना बडगे, मीनल तट्टे, सुशील गुरवे, मुकेश वानखडे, संपदा देशमुख तसेच सर्व कर्मचारी वृंद प्रयत्न करीत आहेत. स्वच्छता पंधरवडा प्रभावितपणे राबविण्याकरिता तसेच सदर उपक्रम मानवी आरोग्यासाठी लाभदायक ठरवण्याकरिता तसेच स्वच्छतेतून आरोग्यदायी उज्वल भविष्याकडे वाटचाल करण्याकरता सर्व मोर्शीकरांनी या पंधरवड्यामध्ये सहभाग घेण्याचे आवाहन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पराग वानखडे यांनी केलेले आहे.

# वलगाव येथे स्वच्छतेसाठी श्रमदान

## स्वच्छता ही सेवा 2024



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 )-** स्वच्छता ही सेवा 2024 उपक्रमांतर्गत आज वलगाव येथे स्वच्छतेसाठी श्रमदान करण्यात आले. गावातील मुख्य रस्त्यावरील अस्वच्छ जागा श्रमदानातून स्वच्छ करत उघड्यावर टाकण्यात आलेले प्लास्टिक तथा कचरा संकलीत करुन त्याचे व्यवस्थापन करण्यात आले. गावातील ग्रामस्थ आणि कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी जिल्हा परिषद अमरावती पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुळकर्णी, गटविकास अधिकारी अमरावती अभिषेक कासोदे, वलगाव ग्रामपंचायत सरपंच सुधीर उगले, ग्रामविकास अधिकारी आशिष भागवत, ग्रामपंचायत पदाधिकारी तथा स्थानिक आशा, अंगणवाडी, सीआरपी व इतर सर्व विभागाचे कर्मचारी ,सोबतच पंचायत समिती अमरावती मधील अधीकारी कर्मचारी, बीआरसी कक्षातील रूपाली धस्कट, जयश्री चौधरी आणि जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाची टीम उपस्थित होती.

# ग्रामीण पोलीस दलातील अधिकाऱ्यांमध्ये अस्थैर्य?

## 5 अधिकारी मॅटमध्ये, पोलीस निरीक्षकांमध्ये नैराश्याचे




**बादल डकरे**

**चांदूर बाजार,( दि.18 )-** ग्रामीण पोलीस दलात अन्यायी बदल्या करण्यात आल्या असल्याचा आरोप करित 5 अधिकाऱ्यांनी मॅटमध्ये धाव घेतली आहे, परंतू त्यांना अजूनही दिलासा मिळाला नाही. दुसरीकडे मोजच्या ठाणेदारावर वरिष्ठांची कृपा होत असल्याने काही पोलीस निरीक्षकांमध्ये नैराश्याचे वातावरण दिसत आहे. ठाणेदारांना कंट्रोल रुममध्ये ठेवून महत्वाचे ठाण्यांमध्ये ठाणेदार पद रिक्त ठेवण्यामागचे नेमके काय कारण, या सर्व प्रकारामूळे ग्रामीण पोलीस दलात अस्थैर्य निर्माण तर होत नाही न, असे वाटायला लागले आहे.

अमरावती ग्रामीण पोलीस दलातील जवळपास होम डिव्हायएसपीसह अन्य चार पोलीस निरीक्षक हे मॅट मध्ये गेले आहे. अनेक ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदारांच्या तक्रारी लोकप्रतिनिधी तथा जनसामान्यांकडून एसपी कार्यालयात पोहोचत आहे. तरी पोलीस अधिक्षक यामध्ये ठोस पाऊल उचलत नसल्याने वादाच्या भोवऱ्यात असलेल्या ठाणेदारांना त्याच ठिकाणी ठेवत आहे. ज्यामूळे जनसामान्य व लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये ग्रामीण पोलिसींगबद्दल एक संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. माहिती आहे की, अर्जुन ठोसरे होम डीवायएसपी यांची बदली बुलढाणा येथे, संदीप चव्हाण यांची बदली अकोला येथे, अचलपूर वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक संजय शिरभाते याची बदली अकोला येथे, अंजनगाव सुर्जी ठाणेदार अहिरे यांची बदली केली असल्याने ,नियंत्रण कशात असलेले पोलीस निरीक्षक सतिश पाटील यांची चांदुर रेलवे वरून बदली झाल्यानें ते मॅट मध्ये गेले होते मात्र स्टे मिळाले नंतर अर्जुन ठोसरे,अहिरे हे कायम आपल्या जागी असून सतीश पाटील हे डीसबी,संदिप चव्हाण अचलपूर वाहतूक शाखा संजय शिरभाते हे नियंत्रण कक्षात आहे. ठिकाणी आत्या ठिकाणी पाठवले यामधील शिरभाते नियंत्रण कक्षात च ठेवण्यात आले.आहे.

### फक्त चव्हाणांनाच सॉफ्ट कॉर्नर का ?

माहितीनूसार मॅटमध्ये जाणाऱ्या इतर ठाणेदारांप्रमाणे अचलपूर वाहतूक शाखेचे अधिकृत आणि परतवाडा येथील अनधिकृत ठाणेदार संदीप चव्हाण यांचाही समावेश आहे. कारण यांचीही बदली अकोला येथे करण्यात आली आहे. त्यांना ती बदली मान्य नसल्याने त्यांनी मॅटमध्ये अपील दाखल केली आहे. मग मॅटचा निकाल लागेपर्यंत त्यांनाही इतर ठाणेदारांप्रमाणे कंट्रोल रुम ला जमा करायला पाहीजे होते, न्याय हा सर्वांकरिता समान असायला हवा होता, परंतू संदीप चव्हाणांना पोलीस अधिक्षकांकडून वेळोवेळी सॉफ्ट कॉर्नर दिल्या जात आहे. त्यांना वारंवार अनभिषिक्त परतवाडा नरेश करण्यामागील काय कारण असावे, परतवाडा ठाण्याचा चार्ज आता ही नावापूरता अचलपूर ठाणेदार मेहत्रे यांच्याकडे परंतू कारभारी चव्हाणचं आहे, चव्हाणांवर ऐवढी कृपा का? असे एक ना अनेक प्रश्न चव्हानांबाबतीत अनुत्तरणीय आहेत.

### तोंडावर निवडणूका आणि बदलीसाठी चढाओढ

दि.30 ऑगस्ट 2024 ला अचलपूर वाहतूक शाखेचे अधिकारी पोलीस निरीक्षक संजय शिरभाते यांची बदली अकोला येथे करण्यात आली, ते या बदलीविरोधात मॅटमध्ये गेले. तसेच एक होम डिवायएसपी व इतर तीन पोलीस निरीक्षकांनीही मॅट ची कवाडे वाजविली आहे. आता कोठे गणेश उत्सव पार पडले आहे, आता अवघ्या काही दिवसात नवरात्री व त्यानंतर दिवाळी त्यानंतर लगेच विधानसभा निवडणूका होणार आहे. असे असताना जिल्ह्यातील कायदा व सुवस्था सांभाळणारे असे अजून किती अधिकाऱ्यांना आपल्या पोस्टींगसाठी 'पाईप लाईन' मध्ये रहावे लागणार आहे. याप्रकाराची पोलीस अधीक्षकांनी वेळीच दखल घेणे आवश्यक आहे. ज्यामूळे ऐनवेळी धावपळ होणार नाही, आणि ठाणेदारांमध्येही काम करताना निराशा राहणार नाही.

### जिल्ह्याकडे पालकमंत्र्यांची पाठ ?

जिल्ह्यातील सर्व प्रशासनाचे सुत्र पालकमंत्र्यांकडे असतात, परंतू अमरावती जिल्हा पालकमंत्री असूनही बेवारस आहे. कारण विद्यमान पालकमंत्र्यांची जिल्ह्याकडे पाठ असल्याने येथील महत्वाच्या अधिकाऱ्यांवर कुणाचेच नियंत्रण नाही, तक्रारी कुणाकडे करायच्या असाही प्रश्न अधिकाऱ्यांना पडत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील नमूद मालमत्ता खरेदी करण्याचा सौदा मारोती लखु उईके, रा. हातला (कस्तुरा), भानखेडा खुर्द, ता. जि. अमरावती यांच्या सोबत केलेला आहे.

शेतजमिनीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

मौजे-हातला, ता.जि. अमरावती येथील भुमापन क्रमांक व उपविभाग क्र.१५/२ भोगवटदार वर्ग-१, आकार रू. २.१५/-, क्षेत्रफळ १.६२ हे.आर. सालीम कोरडवाहू शेतजमीन यामध्ये असलेले झाडाझुडपासह, दगडगोटयासह (इतर अधिकारातील हक्क कायम राहील) याची चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस :- रस्ता, उत्तरेस :- अशोक श्रीराम भलावी यांचे शेत,

पश्चिमेस :- शालिकराम टेकाम यांचे शेत, दक्षिणेस :- रस्ता

उपरोक्त नमूद मिळकतीवर (शेतजमिनीवर) कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोझा, वारसहक्क, जप्ती, कर्ज, ताबा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, सरकारी निमसरकारी कर्ज, न्यायालयीन प्रकरण, वादविवाद, लिज पेंड्स अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसांचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह कागदोपत्री वरील नमूद पत्यावर संपर्क साधावा. मुदतीनंतर माझे पक्षकार सदर्हू मिळकतीचा सौदा करण्यास स्वतंत्र राहतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

याकरीता सदर जाहीर नोटीस.

ठिकाण :- अमरावती

दिनांक :- १७/०९/२०२४

शिक्का

( ॲड. एस.बी. तिवारी )
अमरावती
मो. ९५१८७३१४२१